सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६

## मुंबई पण कर अधिनियम, १९२५

(दिनांक १० एप्रिल, १९८५ पर्यंत सुधारलेला)

---

**Government of Maharashtra**
**Law and Judiciary Department**

# Bombay Act No. VI of 1925

## The Bombay Betting Tax Act, 1925

*(As modified upto 10th April 1985)*

PRINTED IN INDIA BY THE MANAGER, GOVERNMENT PRESS AND STATIONERY STORES, KOLHAPUR AND PUBLISHED BY THE DIRECTOR, GOVERNMENT PRINTING AND STATIONERY, MAHARASHTRA STATE, MUMBAI-400 004.

2006

[Price : Rs.2-00]

# मुंबई पण कर अधिनियम, १९२५

## (सन १९२५ चा मुंबई ६)

# THE BOMBAY BETTING TAX ACT, 1925

## (Bom. VI of 1925)

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव .. .. .. | १ |
| २. | व्याप्ती .. .. .. | २ |
| ३. | अंमल .. .. .. | २ |
| ४. | व्याख्या .. .. .. | २ |
| ५. | पणगणनायंत्रावर कर व त्याचा भरणा .. .. .. | ४ |
| ६. | पणगणनायंत्रावरील कर शासनाकडे भरणे .. .. .. | ४ |
| ७. | पणगणनायंत्राच्या हिशोबांची तपासणी .. .. .. | ४ |
| ८. | पण लावण्यावरील कर .. .. .. | ५ |
| ९. | लायसन्स दिलेल्या बुकमेकरांची यादी .. .. .. | ५ |
| १०. | पणगणनायंत्रावरील कर वसूल करण्याची पध्दत .. .. .. | ६ |
| ११. | नियम .. .. .. | ६ |
| १२. | सन १९२३ चा मुंबई अधिनियम १, याच्या कलम ३ ची सुधारणा (छापलेली नाही) .. | ६ |

# सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.[१]

## [मुंबई पण कर अधिनियम, १९२५]*

[या अधिनियमाला गव्हर्नर जनरल यांची अनुमती तारीख २३ नोव्हेंबर १९२५ रोजी मिळाली. प्रथम मुंबई राजपत्रात २६ नोव्हेंबर १९२५ रोजी अनुमती प्रसिध्द करण्यात आली.]

ह्या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.

सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, कलम १४.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ (२४ ऑक्टोबर १९७४)†.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ (१ नोव्हेंबर १९७६)†.

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ‡ (३ डिसेंबर १९८२)†.

### [२][पण लावण्याच्या काही प्रकारांवर] कर बसविण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई इलाख्याच्या शासकीय उत्पन्नात वाढ करणे आणि त्या कारणांसाठी [२][ पण लावण्याच्या काही प्रकारांवर ] कर बसविणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** प्रस्तुत अधिनियम संमत करण्यासाठी भारत शासन अधिनियम, कलम ८०-अ अन्वये आवश्यक असलेली गव्हर्नर जनरल यांची पूर्वमंजुरी मिळविण्यात आली आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव.

**१.** ह्या अधिनियमास मुंबई [३][ * * * * * * ] पण कर अधिनियम, १९२५ असे म्हणावे.

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी मुंबई सरकारचे राजपत्र, १९२५, भाग पाच, पृ. ६२ पहा ; प्रवर समितीच्या अहवालासाठी तेच राजपत्र, १९२५, भाग पाच, पृ. २५९-६२ पहा ; आणि परिषदेतील कामकाजवृत्तासाठी बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल डिबेट्स, १९२५, खंड पंधरा व सोळा पहा.

[२] "पणगणनायंत्रावर पण लावण्यावर" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम २ अन्वये दाखल करण्यात आला.

[३] "पणगणनायंत्रावरील" हा शब्द सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३ अन्वये वगळण्यात आला.

* सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास तो लागू करण्यात आला आहे. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २ पहा).

† ही अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख होय.

‡ सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश १९ हा सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ४ द्वारे निरसित करण्यात आला.

व्याप्ती. [१][२. तो सबंध [२][ महाराष्ट्र राज्यास ] लागू आहे. ]

अंमल. ३. (१) तो प्रथमत :

(अ) मुंबई शहर व

(ब) पुणे छावणी,

यांत [३][* * * *] अमलात येईल.

(२) [४][[५][राज्य] शासनास,] [६][**शासकीय राजपत्रात**] प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखेस [७][महाराष्ट्र राज्यातील] इतर कोणत्याही क्षेत्रात अमलात येईल असा निदेश देता येईल :

[८][परंतु मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन्स देण्याबाबत आणि मुंबई पण कर (व्याप्ती वाढविणे व सुधारणा यांबाबत) अधिनियम, १९५८ अमलात आल्यावर तो, हैदराबादचा घोड्यांच्या शर्यती व पण यांवर कर बसविण्याबाबत विनियम) १३५८ फसली हा अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या विभागात अमलात होता त्या विभागात अमलात येईल. १९५८ चा मुंबई ४८. १३५८ फ. चा हैद्राबाद विनियम.

व्याख्या. ४. विषयात किंवा संदर्भात **याविरूध्द** काही नसल्यास, ह्या अधिनियमात--

[९](एक) "पैसे लावणांरी व्यक्ती" ह्या संज्ञेत पणगणनायंत्रावर (टोटलायझेटर) किंवा लायसन्स दिलेल्या बुकमेकरबरोबर [१०][जी शर्यतीची जागा या राज्यात किंवा राज्याबाहेत असेल अशा शर्यतीच्या जागांवर होणाऱ्या घोड्यांच्या शर्यतीवर [११][किंवा कुत्र्यांच्या शर्यतीवर] पण लावणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;)]

(दोन) "पण" ह्या शब्दात "पैजेचा" व "पण लावणे" ह्या शब्दप्रयोगात "पैज लावणे" ह्या शब्दप्रयोगाचा समावेश होतो ;

(तीन) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले.

---

[१] मूळ मजकूराऐवजी हे कलम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४ (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

[२] "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[३] "सन १९२५ च्या डिसेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेपासून" हा मजकूर सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ४ अन्वये वगळण्यात आला.

[४] "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारास" हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन परिषद या अन्वये दाखल करण्यात आला.

[५] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[६] "मुंबई सरकारच्या राजपत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर वरील आदेशान्वये दाखल करण्यात आला.

[७] "मुंबई राज्यातील" या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[८] हे परंतुक सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ४(ब) अन्वये दाखल करण्यात आले.

[९] मूळ खंडाऐवजी हा खंड सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५(अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[१०] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ३(१) अन्वये हा मजकूर तारीख १ मे १९७३ पासून समाविष्ट केल्याचे मानण्यात आले.

[११] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१९१२ चा मुंबई ३. (चार) "लायसन्सदार" ह्या संज्ञेचा अर्थ, मुंबई शर्यत मैदान लायसन्स अधिनियम, १९१२, कलम ४ अन्वये शर्यत मैदानांवरील घोड्यांच्या शर्यतीसाठी ज्यास लायसन्स देण्यात आले आहे अशी व्यक्ती, असा समजावा ;

१९१२ चा मुंबई ३. १९७६ चा महा. ३३. [१][(पाच) "लायसन्स दिलेला बुकमेकर" ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ, लायसन्सात किंवा परवान्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, मुंबई शर्यत मैदान लायसन्स अधिनियम, १९१२ [२][किंवा महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतीच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६] याअन्वये आपला धंदा किंवा व्यवसाय चालविता यावा म्हणून लायसन्सदाराने दिलेल्या लायसन्सअन्वये किंवा परवान्याअन्वये बुकमेकरचा किंवा टर्फ कमिशन एजंटचा धंदा किंवा व्यवसाय जी चालविते किंवा बुकमेकर किंवा टर्फ कमिशन एजंट म्हणून जी काम करते अशी कोणतीही व्यक्ती असा समजावा ;]

१९१२ चा मुंबई ३. १९७६ चा महा. ३३. [३][(सहा)] "पणगणनायंत्र" ह्या संज्ञेचा अर्थ, मुंबई शर्यत मैदान लायसन्स अधिनियम, १९१२ [२][किंवा महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतीच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६] यास अनुसरुन लायसन्सदाराने जी परिवेष्टित जागा निराळी राखून ठेवली असेल त्या जागेतील पणगणनायंत्र, [४][किंवा या बाबतीत राज्य शासनाने मान्य केलेल्या कोणत्याही इतर ठिकाणी लायसन्सदारांनी बसविलेले पणगणनायंत्र] असा समजावा व तीत पणगणनायंत्र ह्या नावाने ओळखण्यात येणाऱ्या कोणत्याही उपकरणाचा, यंत्राचा किंवा साधनाचा किंवा तशाच स्वरूपाच्या इतर कोणत्याही उपकरणांचा, यंत्राचा किंवा साधनाचा किंवा तशाच तत्त्वावर कितीही व्यक्तींस एकमेकींशी [५][जी शर्यतीची जागा या राज्यात किंवा राज्याबाहेर असेल अशा शर्यतीच्या जागांवर होणाऱ्या घोड्यांच्या शर्यतीवर [२][किंवा कुत्र्यांच्या शर्यतीवर]] पण लावणे शक्य व्हावे म्हणून केलेल्या कोणत्याही योजनेचा समावेश होतो.

१९१२ चा मुंबई ३. १९७६ चा महा. ३३. [५][(सात) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९१२ [२][किंवा यथास्थिति, महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६] यामध्ये जे अर्थ नेमून देण्यात आले असतील तेच अर्थ असतील.]

---

[१] हा खंड सन १९३१, मुंबई अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५ (ब) अन्वये जादा दाखल करण्यात आला.

[२] हे शब्द सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ च्या कलम ११ अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

[३] या खंडास खंड (६) हा नवीन क्रमांक सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याचे कलम ५ (क) अन्वये देण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम १२, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ३ (२) अन्वये हा मजकूर तारीख १ मे १९७३ पासून समाविष्ट केल्याचे मानण्यात आले.

पणगणना यंत्रावर कर व त्याचा भरणा.

**५.** ज्याचा ह्या अधिनियमांत यापुढे पणगणनायंत्रकर असा उल्लेख केला आहे असा एक कर पण लावणाऱ्या व्यक्तीवर आकारला पाहिजे, वसूल केला पाहिजे व [१][महाराष्ट्र शासनाकडे] भरला पाहिजे. असा कर होडीच्या किंवा पणाच्या रूपाने कोणत्याही पणगणनायंत्रात भरलेल्या सर्व पैशांतून दिला पाहिजे व तो अशा रीतीने भरलेल्या प्रत्येक रकमेच्या [२][शेकडा २५ टक्क्यांहून] अधिक नाही असा [३][[४][राज्य] शासन] याबाबत वेळोवेळी जो दर जाहीर करील *त्या दराने आकारला पाहिजे [५][[४][राज्य] शासनाने] वर सांगितल्याप्रमाणे याबाबत जाहीर केलेल्या दराने आकारणी करून पणगणनायंत्रकराची जी रक्कम होईल त्या रकमेइतका होणारा अशा रीतीने पणगणनायंत्रात भरलेल्या पैशांचा असा भाग पणगणनायंत्रकर म्हणून पैसे लावणाऱ्याने भरला आहे असे समजले पाहिजे व तो लायसन्सदारांनी [६][महाराष्ट्र शासनाच्या] वतीने घेतला पाहिजे.

पणगणना यंत्रावरील कर शासनाकडे भरणे.

**६.** लायसन्सदारांनी, याबाबत विहित केलेल्या वेळी व विहित केलेल्या रीतीने व विहित केलेल्या अधिकाऱ्याकडे, शर्यतीच्या कोणत्याही दिवशी [७][जी शर्यतीची जागा या राज्यात किंवा राज्याबाहेर असेल अशा शर्यतीच्या जागांवर होणाऱ्या घोड्यांच्या शर्यती संबंधात [८][किंवा कोणत्याही कुत्र्यांच्या शर्यतीसंबंधात] पणगणनायंत्रांत भरलेल्या पैशांची एकूण रक्कम दर्शविणारे एक पत्रक पाठविले पाहिजे आणि शर्यतीच्या प्रत्येक दिवशी वसूल केलेली कराची रक्कम, जेव्हा जेव्हा त्यास सांगण्यात येईल तेव्हा तेव्हा, विहित अधिकाऱ्याच्या स्वाधीन केली पाहिजे.

पणगणना यंत्राच्या हिशेबांची तपासणी.

**७.** पणगणनायंत्राचे हिशेब जिच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली आहेत अशा प्रत्येक व्यक्तीने, [५][[४][राज्य] शासनाने] याबाबत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याकडून तसे करण्यास लेखी सांगण्यात आल्यावर, अशा अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबत लेखी प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास असे हिशेब तपासण्यास व त्यांच्या नकला करून घेण्यास परवानगी दिली पाहिजे.

---

[१] "मुंबई सरकारकडे"ह्या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] "१५ टक्क्यांहून" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याचे कलम २ याअन्वये दाखल करण्यात आला.

[३] "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये दाखल करण्यात आला.

[४] "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[५] "गव्हर्नर इन कौन्सिलने" याऐवजी "प्रांतिक शासनाने" हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन परिषदादेश या अन्वये दाखल करण्यात आला.

[६] "मुंबई सरकारच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[७] सन १९७४ चा महा. अधि. क्रमांक ४४, कलम ३ (२) अन्वये हा मजकूर तारीख १ मे १९७३ पासून समाविष्ट केल्याचे मानण्यात आले.

[८] हे शब्द सन १९७६ चा महा. अधि. क्रमांक ३३ च्या कलम ११ अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

* या कलमाखालील अधिसूचनेकरिता शासकीय अधिसूचना, महसूल विभाग, क्रमांक ४३९७ ए, दिनांक १७ जून १९२६ पहा. ही अधिसूचना मुंबई शासन राजपत्र, १९२६, भाग एक, पृष्ठ १४३९ वर प्रसिध्द करण्यात आली होती.

[१][८. (१) [२][* * * *] [३][जी शर्यतीची जागा या राज्यात किंवा राज्याबाहेर असेल अशा शर्यतीच्या जागांवर होण्याच्या] प्रत्येक शर्यतीच्या बाबतीत एक कर--ज्याचा या अधिनियमात यापुढे पण लावण्यावरील कर असा उल्लेख केला आहे--आकारला पाहिजे, वसूल केला पाहिजे व [४][महाराष्ट्र शासनाकडे] भरला पाहिजे. असा कर मुंबई शर्यत मैदान लायसन्स अधिनियम, १९१२ [५][किंवा यथास्थिती, महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६] यास अनुसरून लायसन्सदारांनी निराळ्या राखून ठेवलेल्या परिवेष्टित जागेत केलेल्या कोणत्याही पणाच्या बाबतीत पैसे लावणाऱ्या व्यक्तीने लायसेन्स मिळालेल्या बुकमेकरास दिलेल्या किंवा देण्याचे कबूल केलेल्या सर्व पैशांतून दिला पाहिजे व तो अशा सबंध रकमेच्या [६][शेकडा २५ टक्क्यांहून] अधिक नाही असा [७][शासन] [८][राज्य] याबाबत जो दर जाहीर करील त्या दराने आकारला पाहिजे.

पण लावण्यावरील कर.

१९१२ चा मुंबई ३.
१९७६ चा महा. ३३.

(२) पण लावण्यावरील कर विहित करण्यात येईल अशा रीतीने वसूल केला पाहिजे व शासनाकडे भरला पाहिजे.

[९][(३) या कलमान्वये भरावा लागणारा पण कर देण्यात कसूर केल्यास तो न देणाऱ्या व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल.]

९. (१) लायसन्सदारांनी, बुकमेकरचा धंदा किंवा व्यवसाय चालविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी लायसन्स किंवा परवाना ज्यास दिला असेल त्या बुकमेकरांची नावे ज्यात नमूद केलेली आहेत अशी विवरणे, विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा रीतीने, विहित केलेल्या अधिकाऱ्यांकडे पाठविली पाहिजेत.

लायसन्स दिलेल्या बुकमेकरांची यादी.

(२) लायसन्स दिलेल्या सर्व बुकमेकरांनी पणासंबंधी पैसे लावणाऱ्या व्यक्तींनी त्यांस दिलेल्या किंवा देण्याचे कबूल केलेल्या सर्व रकमांचे हिशेब, विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवले पाहिजेत व [७][[८][राज्य] शासनाने] याबाबत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याने तसे करण्यास लेखी सांगितले असता अशा अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबत लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असे हिशेब तपासण्यास व त्यांच्या नकला करून घेण्यास परवानगी दिली पाहिजे.]

---

[१] कलमे ८ व ९ ही सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ६ अन्वये दाखल करयात आली.

[२] "राज्य सरकारकडून याबाबतीत अधिसूचित करण्यात येईल अशा तारखेपासून" हा मजकूर सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ३०, कलम ३ (अ) अन्वये वगळण्यात आला.

[३] सन १९७४ चा महा. अधि. क्रमांक ४४, कलम ५ अन्वये हा मजकूर तारीख १ मे १९७३ पासून दाखल केल्याचे मानण्यात आले.

[४] "मुंबई सरकारकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[५] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] "शेकडा १५ टक्क्यांहून" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३ याअन्वये दाखल करण्यात आला.

[७] "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन आदेश या अन्वये त्याच्या व्याकरणिक रुपभेदांसह दाखल करण्यात आला.

[८] "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[९] हे पोट-कलम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ४ (क) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

पणगणना यंत्रावरील कर वसूल करण्याची पध्दत.

[1][**१०.** कलम ५ अन्वये भरावयाचा पणगणनायंत्रकर लायसन्सदारांकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.]

नियम.

[1][**११.** पणगणनायंत्रकराचा [2][व पण लावण्यावरील कराचा] भरणा, ह्या अधिनियमा अन्वये ठेवलेले हिशेब हजर करणे व तपासणे यासाठी व सर्वसाधारणपणे ह्या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी व ज्या विहित करण्यात याव्यात असा ह्या अधिनियमात निदेश देण्यात आला आहे त्या सर्व बाबींसंबंधी [3][[4][राज्य] शासनास] [5]नियम करता येतील.]

सन १९२३ चा मुंबई अधिनियम १, याच्या कलम ३ ची सुधारणा.

**१२.** (ह्या कलमा अन्वये केलेली सुधारणा मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९३३ यात समाविष्ट करण्यात आली आहे.) १९२३ चा मुंबई १.

---

[1] ह्या कलमास सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ७ अन्वये नवीन क्रमांक देण्यात आला.

[2] हा मजकूर सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ याचे कलम ८ अन्वये जादा दाखल करण्यात आला.

[3] "गव्हर्नर इन कौन्सिलास" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारास" हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये दाखल करण्यात आला.

[4] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[5] ह्या कलमाखालील नियमांसाठी, दिनांक २२ डिसेंबर १९२५ रोजीचे मुंबई शासनाचे राजपत्र भाग १, पृष्ठे ३२८१-८२ यांवर प्रसिध्द केलेली महसूल विभागाची शासकीय अधिसूचना क्रमांक ५४५७-इ-२४ आणि दिनांक २४ जून १९३१ रोजीचे मुंबई शासनाचे राजपत्र भाग १, पृष्ठे १४९३-९५ यांवर प्रसिध्द केलेली, महसूल विभागाची शासकीय अधिसूचना क्रमांक ५४५७-२४ पहा.

एच ४९-६०८२ पु.-११-२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.